महिला विकास समिती

वार्षिक अहवाल 2013 –2014

विद्यार्थिनीचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने आमच्या महाविद्यालयामध्ये महिला विकास केंद्राची स्थापना करण्यात आली महिला विभागाच्या प्रमुख म्हणून प्रा, सौ, अल्का दहीकर व सदस्य म्हणून प्रा, डी, एस कुरंजेकर, प्रा, कु, आर आर राउत, व प्रा, बी, व्ही बोदेले यांची नियुक्ती करण्यात आली,

या विभागाकडून 2013 –14 या सत्रामध्ये अनेक कार्यक्रम घेण्यात आले, दि, 8 ऑगस्ट रोज गुरूवार या दिवशी बहीणाबाई चौधरी यांच्या जन्मदिनानिमीत्य महाविद्यालयामध्ये मुलींकरीता निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, निबंध स्पर्धेचा विषय 'महिलांचा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातील सहभाग' हा होता यामध्ये अनेक मुलींनी सहभाग घेतला यामध्ये प्रथम क्रमांक कु, कावेरी रामेश्वरजी गौरकर व व्दितीय क्रमांक कु, लोचना केवळराम सांगोळे हिचा आला, या स्पर्धेचे परीक्षण प्रा, के, झेड, लाडे यांनी केले,

दि, 12 ऑक्टोबर 2013 रोज शनिवारला महिला विकास समिती व गृहअर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'महिला व आरोग्य' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, या कार्यकमाचे अध्यक्ष प्राचार्य पी, एम ठाकरे व प्रमुख मार्गदर्शन डॉ, प्रमोद उंदीरवाडे, वैद्यकीय अधिकारी मालेवाडा, तसेच प्रा, सौ, दहीकर व प्रा, कु, राउत ह्या उपस्थित होत्या, कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व क्रांतीज्योती सावीत्रीबाई फूले यांच्या प्रतिमेला माला अर्पण करण्यात आली, या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक डॉ, प्रमोद उंदीरवाडे यांनी ॲनीमीया, सिकलसेल, व्यक्तिगत स्वच्छता व स्त्रियांच्या आरोग्यविषयक समस्या या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले, तर कायक्रमाचे अध्यक्ष प्रा, पी, एम ठाकरे यांनी स्त्रिचे आरोग्य, पर्यावरणीय स्वच्छता या विषयी मार्गदर्शन केले, धावपळीच्या जीवनामध्ये तरूणींनी स्वतःचे आरोग्य जपणे व सुदृढ निरोगी आयुष्य जगने आवश्यक आहे, असे विचार प्रा, राउत मॅडम यांनी व्यक्त केले, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा, सौ, दहीकर यांनी केले, कार्यक्रमाचे संचालन कु, रभा लांडगे हिने केले, तर आभार कु, नेहा लांडगे हिने मानले, या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा, बोदेले व प्रा, कुरंजेकर यांनी सहकार्य केले,

दि, 3 जानेवारी रोज शुक्रवारला महिला मुक्तीदीन आणि सावित्रीबाई फूले यांच्या जयंती निमित्य पाककला या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, या स्पर्धेमध्ये बहूसंख्य

Scanned by CamScanner

विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता, यामध्ये प्रथम क्रमांक कु. नेहा लांडगे व द्वितीय क्रमांक कु. ललिता कापगते हिचा आला, या स्पर्धेचे परीक्षण सौ ठाकरे सौ, कुरंजेकर व सौ, नखाते यानी केले व आभार कु. स्नेहा बुराडे हिने मानले,

अध्यक्ष

महिला विकास समिती

सत्र 2013 –14

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय

लाखांदुर जि, भंडारा

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर, जि. भंडारा
महिला विकास समिती

(वार्षिक अहवाल - २०१४-२०१५)

विद्यार्थिनींचा सर्वांगीन विकास होण्याच्या दृष्टीने आमच्या महाविद्यालयामध्ये महिला विकास केंद्राची स्थापना करण्यात आली. महिला विभागाच्या प्रमुख म्हणून प्रा. सौ. अल्का दहीकर व सदस्य म्हणून प्रा. राऊत, प्रा. कुरंजेकर, प्रा. नखाते यांची नियुक्ती करण्यात आली.

या विभागाकडून २०१४-२०१५ या सत्रामध्ये अनेक कार्यक्रम घेण्यात आले. दि. ८ ऑगस्ट या दिवशी बहीनाबाई चौधरी यांच्या जन्म दिनानिमीत्य महाविद्यालयामध्ये विद्यार्थिनींकरीता तसेच महीलांकरीता कायदेविषयक कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फूले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंतर स्वागताचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य पी. एम ठाकरे हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून मा. जिल्हा परीषद अध्यक्ष ॲड. वसंता एंचीलवार व श्रीमती मृणाल मुनेश्वर जिल्हा समन्वयक भंडारा हया होत्या. या कार्यक्रमाचे प्रास्तावीक प्रा. अल्का दहीकर यांनी केले. ॲड एंचीलवार यांनी संकटात सापडलेल्या महिलाना मदत करा असा संदेश दिला तर श्रीमती मृणाल मुनेश्वर यांनी महिलांच्या समस्या महिलांवर होणारे अत्याचार व त्याविषयी कायदे, स्वतःचे सरंक्षण कसे करायचे याविषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन विद्यार्थीनीच्या व महीला संदर्भात कायदा व सुव्यवस्था याविषयी महीलांनी सुध्दा स्वतः जागरुक असणे आवश्यक आहे असे प्रतिपादन अध्यक्षिय भाषणातुन प्राचार्य ठाकरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन कु. रोहीनी हूमे हिने केले. तर आभार कु. लिना मेश्राम हिने मानले. या कार्यक्रमाच्या यश स्वीतेसाठी प्रा. नखाते, प्रा. कुरंजेकर यांनी सहकार्य केले.

दि. १३ आक्टोंबर रोज सोमवारला महिला विकास समीतीच्या वतीने मुलींकरीता आरोग्य तपासणी हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रिबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. नंतर स्वागताचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. पी. एम. ठाकरे हे होते व प्रमुख अतिथी म्हणून डॉ. ममता राऊत हया होत्या संचालन प्रा. कु. रीता राऊत यांनी केले व प्रास्तावीक प्रा. सौ. अल्का दहीकर यांनी केले.

डॉ. ममता राऊत यांनी विद्यार्थिनींना आरोग्याविषयी माहीती दिली. शेवटी अध्यक्षांचे भाषण झाले व पाहूण्यांचे आभार कु. स्नेहा बुरडे हिने मानले. नंतर डॉ. ममता राऊत यांनी विद्यार्थीनींची आरोग्य तपासणी केली. यामध्ये बहूसंख्य विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता.

Scanned by CamScanner

दि. ३ जानेवारी रोज शुक्रवारला महिला मुक्तीदिन आणि सावित्रीबाई फूले यांच्या जय तीनिमीत्य निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये बहूसंख्य विद्यार्थीनींनी सहभाग घेत ला होता. निबंध स्पर्धेचा विषय महिलांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील सहभाग हा होत ा. यामध्ये प्रथम क्रमांक कु. कावेरी रामेश्वरजी गोरेकर व द्वितीय क्रमाक लोचना केवळराम सांगोळे हिन ा आला. या स्पर्घेचे परीक्षण प्रा. के. झेड. लाडे यांनी केले.

अध्यक्ष
महिला विकास समिती
सत्र २०१४-२०१५
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
लाखांदूर जि. भंडारा

Scanned by CamScanner

तरुण भारत
शुक्रवार, २२ ऑगस्ट २०१४

चव्हाण महाविद्यालयात महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन

प्रसा प्रतिनिधी

लाखांदूर, २१ ऑगस्ट

स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महिला समितीच्या सदस्य सुवर्णिनाचे औचित्य साधून महिलांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. एम. ठाकरे तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिप अध्यक्ष ॲड. वसंता एंचिलवार, जिल्हा समन्वयक मृणाल सुदेश्वर यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्रा. अल्का दहीकर यांनी तर संचालन रोहिणी हुमे आणि उपस्थितांचे आभार लीना मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. बोदेले, लाडे, कुरंजेकर, वास्तिक, ठेंगरे, मस्के, ढुका, तलमले, राऊत व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

पुण्य नगरी
शुक्रवार, २२ ऑगस्ट २०१४

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात कायदेविषयक शिबिर

लाखांदूर
दि. २१ (प्रतिनिधी)

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महिला समितीच्या सदस्यांचे सुवर्णिनाचे औचित्य साधून महिलांसाठी कायदेविषयक शिबिर घेण्यात आले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा प्रतिमेस माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. एम. ठाकरे, प्रमुख अतिथी माजी जि. प. अध्यक्ष ॲड. वसंत एंचिलवार, जिल्हा समन्वयक मृणाल सुदेश्वर उपस्थित होते.

ॲड. वसंत एंचिलवार यांनी मार्गदर्शन करताना संकटात सापडलेल्या मुलींच्या संरक्षणासाठी कायदे आणि [illegible] प्रा. अल्का दहीकर यांनी महिलांच्या समस्या, महिलांचे कौशल्य, आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, [illegible] विषयांवर मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन तरुणी, महिलांचे हक्क, कायदा, आत्मसंरक्षणासंदर्भात चर्चासत्र घेतले. यावेळी [illegible] प्राचार्य ठाकरे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अल्का दहीकर यांनी तर संचालन रोहिणी हुमे हिने केले. आभार लीना मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. बोदेले, प्रा. लाडे, प्रा. कुरंजेकर, प्रा. वास्तिक, प्रा. ठेंगरे, प्रा. मस्के, प्रा. ढुका, प्रा. तलमले, प्रा. राऊत आदी प्राध्यापकांनी सहकार्य केले.

Scanned by CamScanner

सकाळ

बुधवार, दि. २० ऑगस्ट २०१४



लाखांदूर : स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर येथे महिला समितीच्या वतीने युवा दिनाचे औचीत्य साधून महिलांसाठी कायदेविषयक कार्यक्रम घेण्यात आला.

महिलांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन

प्रतिनिधी / १९ ऑगस्ट

लाखांदूर : स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर येथे महिला समितीच्या वतीने युवा दिनाचे औचीत्य साधून महिलांसाठी कायदेविषयक कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य पी.एम.ठाकरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.अध्यक्ष ॲड.वसंता एचिलवार व मृणाल मुनेश्वर हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अलका दहीकर यांनी केले. ॲड.एचिलवार यांनी संकटात सापडलेल्या महिलांना मदत करा असा संदेश दिला. कार्यक्रमाचे संचालन रोहिणी हूमे हिने केले तर आभार लीना मेश्राम हिने मानले.

सकाळ



लाखांदूर : कार्यशाळेत पोस्टरचे अवलोकन करताना मान्यवर.

एड्स प्रतिबंध व नियंत्रण कार्यशाळा

लाखांदूर, ता. १४ : स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात एड्स प्रतिबंध व नियंत्रण या विषयी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बोदेले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जयश्री बन्सोड, आशा काटवले, प्रा. कुरंजेकर, प्रा. अल्का दहीकर उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त युवा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. यात छायाचित्रण, कलाकृती, पोस्टर व घोषणा आणि स्लाईड शो इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. छायाचित्रण स्पर्धेत स्वप्नील बडोले प्रथम तर रोहिणी हुमे प्रोत्साहनपर, कलाकृती स्पर्धेत लिना मेश्राम प्रथम, पोस्टर व घोषणा स्पर्धेत निखिलेश फुलेश्वर यांना प्रथम क्रमांक व सर्व सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रोहिणी हुमे यांनी केले. आभार प्रा. आर. य. ठाकरे यांनी मानले.

Scanned by CamScanner

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर, जि.भंडारा

महिला विकास समिती

वर्षिक अहवाल २०१५–२०१६

विद्यार्थीनीचा सर्वांगीन विकास होण्याच्या दुष्टीने आमच्या महाविद्यालयामध्ये महिला विकास केंद्राची स्थापना करण्यात आली. महिला विभागाच्या प्रमुख म्हणून प्रा. सौ. अल्का दहीकर व सदस्य म्हणून प्रा. रिता राऊत, प्रा. कुरंजेकर, प्रा. नखाते यांनी नियुक्ती करण्यात आली.

या विभागाकडून २०१५ –२०१६ या सत्रामध्ये अनेक कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक ०८ ऑगष्ट या दिवशी बहिणाबाई चौधरी जन्मदिनानिमित्य रांगोळी स्पर्धा, पाककला स्पर्धा आणि पुष्परचना स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक चारू वगारे, द्वितीय क्रमांक जयश्री गोबाडे हिचा आला. तर पाककला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक राजेश्वरी टेभुर्णे , द्वितीय क्रमांक सुषमा भागडकर हिचा आला. पुष्परचना स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कु. दिपाली झोडे हिचा आला आणि द्वितीय क्रमांक कु. लिना मेश्राम हिचा आला.

दिनांक ०३ जानेवारी सावित्रिबाई फुले यांच्या जयंती निमित्य विद्यार्थिनीना स्वंयमरोजगाराच्या दुष्टिकोणातुन कुशन शिकविण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी प्रा. दहिकर हया होत्या , अध्यक्ष पी. एम. ठाकरे, प्रमुख पाहुण्या प्रा. रिता राऊत हया होत्या या कार्यक्रमाचे संचालन कु. जयश्री गोबाडे हिने केले तर आभार प्रदर्शन रोहीणी हुमे हिने यांनतर प्रा. दहिकर यांनी विद्यार्थ्यानीना अनेक प्रकारचे कुशन शिकविले.

दिनांक ०८ मार्च या दिवशी महिला दिनाच्या निमित्याने विद्यार्थीनींना आहार आणि आरोग्य या विषयी कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमामध्ये प्रा. दहिकर यांनी आहारातून आपले आरोग्य आपण कसे चांगले राखु शकतो. या विषयी मार्गदर्शन केले या कार्यक्रमांचे प्रास्ताविक प्रा. रिता राऊत यांनी केले. अध्यक्ष प्रा. कुरंजेकर हे होते. यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याचा मंत्र दिला. या कार्यक्रमाचे संचालन कु. रोहिनी हुमे हिने केले तर आभार प्रदर्शन कु. जयश्री गोबाडे हिने मानले.

अध्यक्ष
महिला विकास समिती
सत्र २०१५–२०१६
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
लाखांदुर जि. भंडारा

Scanned by CamScanner



Scanned by CamScanner

देशोन्नती भंडारा/शुक्रवार, दि. ३० सप्टेंबर २०१६

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात रासेयो स्थापना दिवस

शहर प्रतिनिधी/ २१ सप्टेंबर

लाखांदूर : स्थानीक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर येथे २४ सप्टेंबर रासे योजना स्थापना दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य पी.एम. ठाकरे प्रमुख अतिथी प्रा. नखाते, प्रा. डॉ. व्ही.एम.बळी, प्र. तलमले, डॉ. के.वाय ठाकरे, प्रा. बी.व्ही. बोदेले, प्रा. घरडे, प्रा. तुरकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष स्थाना वरून बोलताना म्हणाले की रासेयोजनेच्या माध्यमातून युवकामध्ये समाज सेवा, राष्ट्र उभारण्यासाठी फार मोठे योगदान असते. त्यासाठी युवकांनी निरोगी व व्यसन मुक्त असने आवश्यक असते असे मत मांडले तसेच यावेळी प्रमुख अतिथी प्रा. नखाते, प्रा. डॉ. बळी, प्र. तलमले यांनी सुध्दा आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन वैशाली हजारे, प्रास्ताविक प्रा. बोदेले तर आभार सोनाली मेश्राम हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डी.एस.कुरंजेकर, प्रा. लाडे, प्रा.वासनिक, प्रा.धोटे, प्रा.बोरकर, प्रा. गणविर, प्रा.मोरघडे, मेश्राम, धोटे, मोहूर्ले आणि रासेयोजने मधील सहभागी स्वयंसेवक यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

पुण्य नगरी
बुधवार, २८ सप्टेंबर २०१६ । भंडारा

श्रीकांत बरिंगे यांचे व्याख्यान आज

लाखांदूर : वीर भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त मराठा सेवा संघ प्रणित वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद शाखा लाखांदूर व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूरच्या संयुक्त विद्यमाने २८ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास शिबिरात छत्रपती शिवाजी महाराज भगतसिंग आणि आजची युवा पिढी या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून वक्ते श्रीकांत बरिंगे राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. एम. ठाकरे हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाध्यक्ष अनिल भुसारी, प्रा. राकेश तलमले, प्रा. विनोद बली, प्रा. बोदेले उपस्थित राहणार आहेत. परिसरातील विद्यार्थी बांधवांनी कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद शाखा लाखांदूरचे तालुकाध्यक्ष आशीष ठाकरे, सं. वि. प्रवक्ते भारत गजापुरे, प्रशांत नेवारे, अमोल राऊत, चेतन ढोरे यांनी केले आहे.

Scanned by CamScanner

रा.से.यो. शिबीराचे उद्घाटना प्रसंगी मार्गदर्शन करतांना
मा. विजय पवार, तहसिलदार लाखांदूर व उपस्थित मान्यवर.

रा.से.यो.च्या "महिला सक्षमिकरण" या विषयावर
मार्गदर्शन करतांना मा. कल्पना नागरकर, सहायक पोलीस
अधिक्षक भंडारा व उपस्थित मान्यवर.

Scanned by CamScanner

रा. से. योजना शिबीरात "महिला सक्षमिकरण" या विषयावर मार्गदर्शन करतांना मा. सौ. सुचिता एस. आगासे. लोकमत सखी मंच. ता. संयोजिका साकोली. व उपस्थित मान्यवर.

रा. से. यो. च्या शिबीरात 'जल अवस्थापण' या विषयावर मार्गदर्शन करतांना मा. एन. आर. गेडाम. ता. कृषी अधिकारी. लाखांदूर मा. राजेश काकडे. प्रा. तलमले. प्रा. ठाकरे.

Scanned by CamScanner

तरुण भारत
www.tarunbharat.net
गुरुवार, २ मार्च २०१७

अन्न भेसळ, विषयावर चर्चासत्र

लाखांदूर : स्थानिक मराठातराव झलखाणे महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागातर्फे अन्न भेसळ आणि रासायनिक विश्लेषण या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राचे उदघाटन भाग्यवान लांजेवार यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य मो. एम. डोंगरे, प्रा. सुधीर सरके, प्रा. लेदास उपस्थित होते. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना अन्न भेसळीबद्दल मार्गदर्शन करून विविधांगी स्पर्श केला. यात अली. सभेत घारू सुधारेन प्रथम, अभिजित मेश्रामने द्वितीय, नीतिका मेरेने तृतीय पुरस्कार पटकाविला. संचालन रोहिणी डुमणे, आभार नीलेश डोंगरे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

सकाळ
नागपूर, सोमवार, ६ मार्च २०१७



लाखांदूर : कार्यशाळेत बोलताना मृणाल मुनेश्वर.

महिला संरक्षणासंबंधात कार्यशाळा

लाखांदूर, ता. ५ : मराठातराव झलखाणे महाविद्यालयात महिला लैंगिक तक्रार निवारण समितीतर्फे महिला सुरक्षेच्या संबंधाने मार्गदर्शनात्मक कार्यशाळा घेण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महिला तक्रार निवारण समितीच्या जिल्हाध्यक्ष मृणाल मुनिश्वर उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महिला तक्रार निवारण समितीच्या तालुकाध्यक्ष सरस्वती मेश्राम उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. एम. डोंगरे होते. या वेळी मृणाल मुनेश्वर यांनी कामाच्या ठिकाणी किंवा सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण कायद्याकरिता असलेल्या कायद्याची जाणीव करून दिली. विद्यार्थ्यांनीना आत्मनिर्भयतेचे धडे दिले. सरस्वती मेश्राम यांनी विद्यार्थिनींचा लैंगिक छळ होण्याचे कारणे, समस्या आणि उपाय यावर माहिती दिली. प्राचार्य डोंगरे यांनी विद्यार्थिनींना स्वतःला सक्षम करण्यास प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. श्रीमती ए. ए. वशिकर यांनी केले. संचालन रोहिणी डुमणे यांनी केले. आभार प्रा. आर. आर. डोकत यांनी मानले. अध्यक्षांच्या करिता समितीचे सदस्य प्रा. कुरेशकर, प्रा. नखाते यांनी सहकार्य केले.

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

उपासकांनी परिश्रम घेतले.

यश प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे

शहर प्रतिनिधी / १५ मार्च

लाखांदूर : विद्यार्थीदशेमध्ये जिवन जगतांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत असतो परंतू विद्यार्थ्यांनी खचून न जाता त्याचा सामना करणे गरजेचे आहे.जिवनामध्ये यश प्राप्त करण्यासाठी सतत प्रयत्न करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन किसानराव खोब्रागडे एज्यू.सोसायटीचे अध्यक्ष भाग्यवान खोब्रागडे यांनी केले.

ते यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व निरोप समारंभ कार्यक्रमाते अध्यक्षस्थानावरुन बोलतांना व्यक्त केले. सदर कार्यक्रमामध्ये मुख्य मार्गदर्शक म्हणून एम.डी.मेडीसिन आयुर्वेद महाविद्यालय नागपूर येथील प्रा.डॉ.माधव आष्टीकर, मोहाडी येथील डेव्हलपमेंट ऑफीसर नरेश दिपटे, सामाजिक कार्यकर्ते मारोतराव दोनाडकर, किसनराव खोब्रागडे, महाविद्यालय आरमोरीचे प्राचार्य डॉ.क्रिष्णा राऊत, डॉ.मोतिराव कावळे, प्राचार्य पि.एम.झाकरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ. विनोद बळी,आष्टीकर, काबळे, विद्यार्थी परिषद सचिव चेतन मोरघडे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. व्यक्तीमत्व विकास व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यक्रमात यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ.माधव आष्टीकर म्हणाले की, चांगले आरोग्य हा व्यक्तीमत्वाचा अविभाज्य अंग आहे. ज्याचे आरोग्य चांगले त्याचेच व्यक्तीमत्व चांगले असू शकते.

जिवनशैलीत योग्य परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. व्यसनाधिनता टाळणे हि आजच्या तरुण पिढीची गरज आहे. यावेळी दिपटे यांनी सांगितले की युपीएससी परिक्षामध्ये खरे पाहता स्पर्धा हि फार मोठी आहे. विद्यार्थ्यांनी सरकारी नौकरीच्या मागे न धावता स्वतः उद्योजक बनून आपले भविष्य उज्वल घडवू शकता.तरुण पिढीने सैराट न होता आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी योग्य ते मार्गदर्शन केले.

यावेळी नुकतेच पिएचडी प्राप्त झालेले प्रा.डॉ.भारत नखाते सावंगी येथील प्रतिष्ठीत शेतकरी मारोतराव दोनाडकर यांचा नुकताच शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. सोबतच महाविद्यालयातून जास्त गुण घेवून प्राविण्य प्राप्त झालेले विद्यार्थ्यांचासुध्दा सत्कार करण्यात आला. यामध्ये समाजशास्त्र विषयात विद्यापिठातून सुवर्णपदक सुरेश देशपांडे यांचा सुध्दा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. विरेंद्र तुरकर प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.विनोद बळी यांनी तर आभार प्रा.डॉ.राकेश तलमले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयाचे प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात जागतिक महिला दिन

शहर प्रतिनिधी / १५ मार्च

लाखांदूर : महिला विकास व महिला तक्रार निवारण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण विद्यालय लाखांदूर येथे दिनांक ९ मार्च रोजी महिला जागतिक दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून महिलांशी संबंधित प्रश्नमंजूषा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आली. याप्रसंगी महिला आर्थिक विकास महामंडळ पंचायत समिती लाखांदूरचे व्यवस्थापक धुर्वे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य पि.एम.झाकरे होते. प्रास्ताविक प्रा.राऊत यांनी केले.धुर्वे यांनी विद्यार्थीनींना शिक्षणाबाबत जागृत

राहण्याचे आवाहन करुन स्वयंरोजगार व रोजगारसंबंधी मार्गदर्शन केले त्यासोबतच पंचायत समिती अंतर्गत घेण्यात येणाऱ्या ब्युटीपालर, ड्रेसडिझायनिंग,पॅगमेकींग, संगणक प्रशिक्षण अशा विविध कोर्सची माहिती यावेळी दिली. महिलांनी आत्मनिर्भर राहून व रोजगार करुन स्वतःचे रक्षण करण्यास तत्पर रहावे असे मत त्यांनी मांडले. संचालन हेमलता नाकतोडे तर आभार प्रा.ए.ए.दहिकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

Scanned by CamScanner